सकाळ

# पटवर्धन कुटुंबीय-'आसमंत'तर्फे संगीत महोत्सवाची पर्वणी



देवकी पंडित

रत्नागिरी, ता. १३ : आर्ट सर्कल आयोजित थिबा राजवाड्याच्या प्रांगणातील कला-संगीत महोत्सव यंदा तपपूर्तीचा उंबरठा ओलांडत आहे. यातील ८ वर्षे पहिल्या दिवशी (कै.) शरद पटवर्धन कुटुंबीय आणि आसमंत बेनेव्हलन्स पुरस्कृत संगीत पर्वणी रसिकांना लाभत आहे. यंदा २५ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता विदुषी देवकी पंडित यांचे गायन ऐकण्याची विनामूल्य संधी रसिकांना लाभणार आहे.

विदुषी देवकी पंडित यांना संगीतसाथ मिलिंद कुलकर्णी (हार्मोनियम), रोहित मुजुमदार (तबला) करणार आहेत. या कार्यक्रमाची जय्यत तयारी सध्या सुरू आहे. संगीत उपासक शरद पटवर्धन हे देवगडमध्ये मफतलाल हायस्कूलमध्ये ४० वर्षांहून अधिक सेवा बजावणाऱ्या (कै.) शंकरराव टेंकशे यांच्याकडून शिकले. टेंकशे यांनी सेवानिवृत्तीनंतर गायनात संगीत अलंकार व डॉक्टरेट मिळविली. संगीतसाधक टेंकशे यांच्याकडूनच पटवर्धन यांना शास्त्रीय संगीताची गोडी निर्माण झाली. त्यामुळे गुरुप्रती कृतज्ञता म्हणून त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शरद पटवर्धन यांनी २००५ पासून रत्नागिरीत शास्त्रीय संगीत मैफलींना मदत देण्यास सुरवात केली. त्यांचे सुपुत्र नंदकुमार यांनाही शास्त्रीय संगीताबद्दल रुची असल्याने वडील शरद पटवर्धन यांच्या पश्चात ते संगीत मैफल, कार्यक्रमांना सढळहस्ते मदत देत आहेत. आसमंत बेनेव्हलन्स या संस्थेमार्फतही संगीत, पर्यावरण व विद्यार्थ्यांसाठी ते सातत्याने उपक्रम राबवत आहेत.

Ratnagiri, Main
14/01/2019 Page No. 3



# थिबा संगीत महोत्सवात रसिकांना पर्वणी!

प्रतिनिधी
रत्नागिरी

आर्ट सर्कल आयोजित थिबा संगीत महोत्सव यंदा तपपूर्तीचा उंबरठा ओलांडत आहे. या १२ वर्षातील गेली ८ वर्षे महोत्सवाला पहिल्या दिवशी कै. शरदराव पटवर्धन कुटुंबीय व आसमंत बेनेव्हलन्सचे प्रायोजकत्व लाभले. याद्वारे संगीत रसिकांना पहिल्या दिवशीच्या कलाकारांची संगीतकला विनामूल्य अनुभवता आली. यंदाही ९ व्या वर्षी विदुषी देवकी पंडित यांचे गायन ऐकण्याची पर्वणी रसिकांना आसमंत बेनेव्हलन्सच्या माध्यमातून लाभणार आहे.



कै.शरदराव पटवर्धन हे संगीत उपासक होते. देवगड येथे मफतलाल हायस्कूलमध्ये ४० वर्षांहून अधिक सेवा बजावणाऱ्या कै.शंकरराव टेंकशे यांच्याकडून त्यांनी शालेय शिक्षण घेतले. विशेष बाब म्हणजे कै. शंकरराव टेंकशे यांनी सेवानिवृत्तीनंतर गायनात संगीत अलंकार व डॉक्टरेट मिळवली होती. अशा संगीतसाधक टेंकशे यांच्याकडून पटवर्धन यांना शास्त्रीय संगीताची गोडी निर्माण झाली.

## पहिल्या दिवशी देवकी पंडित यांचे गायन

यंदा ९ व्या वर्षी महोत्सवाच्या पहिल्या दिवशी २५ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता विदुषी देवकी पंडित यांचे गायन कै. शरदराव पटवर्धन कुटुंबीय आणि आसमंत बेनेव्हलन्स यांच्या माध्यमातून रसिकांना विनामूल्य अनुभवता येणार आहे. त्यांना मिलिंद कुलकर्णी यांची हार्मोनियमसाथ तर रोहित मुजुमदार यांची तबला साथ लाभणार आहे. संगीत रसिकांनी या पर्वणीचा अवश्य लाभ घेण्याचे आवाहन नंदकुमार पटवर्धन यांनी केले आहे.